रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३४३
www.ramprahar.com
शनिवार, १ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग
रायगडातील रातवड येथे पादत्राणे, चर्मोद्योग क्लस्टर/२
आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला चहावाल्याचा सत्कार/३
भारतीय कबड्डी संघ आशियाई चॅम्पियन/८




# जुलैमध्ये मंत्रिमंडळ विस्तार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सरकारचा विस्तार कधी होणार याबाबत स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. जुलै महिन्यात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असे फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ३०) पत्रकारांशी बोलताना सांगितले.

छत्रपती संभाजीनगर विमानतळावर पत्रकारांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्याचे अनेक प्रश्न असतात. त्या संदर्भात दिल्लीला जाऊन भेट घ्यावी लागते, त्याचा पाठपुरावा करावा लागतो. अनेक वेळा बैठकाही असतात. आम्हाला मंत्रिमंडळ विस्तारही करायचा आहेच. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याबाबत निर्णय घेतीलच. मला वाटते जुलै महिन्यात आम्ही विस्तार करू.

महाविकास आघाडीचे सरकार जाऊन राज्यात शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात आले. सरकारच्या यशस्वी वर्षपूर्तीनंतर आता मंत्रिमंडळ



विस्तार होणार आहे.

दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराबरोबरच केंद्रातही शिवसेनेला काही मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद शिवसेनेला मिळू शकते, अशी सूत्रांची माहिती आहे. पंढरपूरमधील शासकीय पूजा आणि सर्व विधी आटोपून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी दिल्लीला रवाना झाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही दिल्लीत गेले आणि मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानुसार लवकरच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे, तर केंद्रातही काही फेरबदल होऊन शिवसेनेला स्थान मिळण्याची चिन्हे आहेत.

---

### कोट्यवधींचा कर्नाळा बँक घोटाळा

# अभिजीत पाटलांचा अटकपूर्व जामीन अर्ज हायकोर्टानेही फेटाळला

**पनवेल : प्रतिनिधी**

शेकाप नेते, माजी आमदार, कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांचे चिरंजीव व बँकेचे संचालक अभिजीत पाटील यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि. ३०) फेटाळला. या वेळी उच्च न्यायालयात शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, अटकपूर्व जामीन फेटाळल्याने आता अभिजीत पाटील यांना केव्हाही अटक होऊ शकते. त्यामुळे जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केलेल्या संचालकांच्या मनातही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.






कर्नाळा बँकेचे संचालक अभिजीत विवेकानंद पाटील यांचा बँक गैरव्यवहारप्रकरणी सक्रिय सहभाग दिसून येत असल्याने पनवेलचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी ९ जून रोजी त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता.

जिल्हा न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर अभिजीत पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. उच्च न्यायालयात न्या. अमित बोरकर यांच्यासमोर शुक्रवारी त्या अर्जावर सुनावणी झाली. या वेळी अभिजीत पाटील यांची बाजू अ‍ॅड. राहुल ठाकूर यांनी मांडली. सरकारतर्फे अ‍ॅड. अमित पालरेचा यांनी अभिजीत पाटील यांच्या अटकपूर्व जामिनाला विरोध केला.

अध्यक्ष विवेक पाटील यांनी कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील गैरव्यवहाराची सर्व जबाबदारी स्वीकारली आहे. तसे लेखी पत्र दिले आहे. त्यामुळे बँकेच्या गैरव्यवहाराशी अभिजीत पाटील यांचा संबंध नाही. म्हणून त्यांचा अटकपूर्व जामीन मंजूर करावा, असा युक्तिवाद अ‍ॅड. राहुल ठाकूर यांनी न्यायालयासमोर केला, मात्र सहकारी बँकेच्या व्यवहाराला सर्व संचालक मंडळ जबाबदार असते. त्यामुळे अभिजीत पाटील यांची जबाबदारी नाकारता येत नाही, असे उच्च न्यायालयाचे न्या. अमित बोरकर यांनी स्पष्ट केले आणि त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

> **अभिजीत पाटील यांचा जामीन अर्ज फेटाळून हायकोर्टानेही कर्नाळा बँक घोटाळ्यात सर्वसामान्य ठेवीदारांवर झालेल्या अन्यायाची दखल घेतली आहे. दोन वर्षे जेलमध्ये असलेल्या विवेक पाटील यांचा त्यांच्या वाढदिवसाला बॅनर लावून उदो उदो करणाऱ्यांनी आता अभिजीत पाटलांचा कर्नाळा बँक घोटाळ्याशी संबंध नाही, हेही जाहीर करून टाकावे.**
>
> **–आमदार प्रशांत ठाकूर**, कार्याध्यक्ष, कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समिती

---

# महाडमध्ये दरड कोसळली

## वाकी-शेवते रस्त्यावरील घटना; गावांचा संपर्क तुटला



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील दुर्गम अशा वाकी-शेवते रस्त्यावर शुक्रवारी (दि. ३०) दुपारी दरड कोसळली. यामुळे हा रस्ता बंद झाला होता. स्थानिक नागरिकांनी या दरडीचा काही भाग बाजूला करून एकेरी वाहतूक सुरू केली.

जोरदार पावसामुळे महाड तालुक्यातील वाकी-शेवते-अड्राई या मार्गावर दुपारी १ वाजण्याच्या सुमारास दरड कोसळली. यामध्ये मोठ-मोठ्याला दगडांचा समावेश होता. दरड कोसळल्यामुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आणि या परिसरातील शेवते आणि अड्राई या दोन गावांचा संपर्क तुटला.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती मिळताच त्यांनी रस्त्यावरील माती दूर केली, मात्र भले मोठे दगड यांत्रिक साधनांशिवाय बाजूला करणे अशक्य असल्याने स्थानिकांच्या मदतीने दुचाकी जाईल इतकी वाट तयार करून तुटलेला संपर्क तात्पुरता पूर्ववत करण्यात आला आहे. उर्वरित दगडी बाजूला करण्यासाठी पोकलेन किंवा जेसीबी आणल्यानंतर हा मार्ग वाहतुकीस खुला केला जाईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले.

# मुंबई लोकलमध्ये तरुणीचा विनयभंग करणाऱ्याला बेड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

धावत्या लोकलमध्ये २४ वर्षीय तरुणीची छेडछाड, अश्लील बोलून शिवीगाळ केल्याप्रकरणी तरुणाला नालासोपारा येथून अटक करण्यात आली आहे. रोशन पटेल असे आरोपीचे नाव असून त्याने शुक्रवारी सकाळी धावत्या लोकलमध्ये तरुणीचा विनयभंग केला होता.

मालाड येथे राहणारी ही तरुणी २३ जून रोजी कामानिमित्त चर्नी रोड येथे लोकलने जात होती. ग्रँड रोड रेल्वेस्थानकादरम्यान एका तरुणाने तिची छेड काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तरुणीने आरडाओरडा केला असता त्याने तिथून पळ काढला. तरुणीने पाच दिवसांनंतर पोलिसांशी संपर्क साधून तरुणाविरोधात तक्रार दिली. त्यानुसार मुंबई सेंट्रल रेल्वे पोलिसांनी अज्ञात तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून सीसीटीव्हीच्या आधारे त्याचा शोध सुरू केला. अखेर त्याला अटक करण्यात आली आहे.

---



# रोह्यातील चणेरा विभागाला पावसाचा तडाखा

## नंदप आदिवासीवाडी येथे घरांची छपरे उडाली, ग्रामस्थ जखमी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चणेरा विभागातील नंदप आदिवासीवाडी येथील काही घरांचे पत्रे उडाल्याची घटना घडली आहे. गुरुवारी (दि. २९) रात्रीच्या वेळी हा प्रकार घडल्यामुळे यामध्ये पाच ग्रामस्थ किरकोळ जखमी होते. तीन ते चार घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याची माहिती रोहा तहसील कार्यालयाकडून मिळाली आहे.



तहसीलदार किशोर देशमुख यांचे आदेशानुसार अप्पर तहसीलदार प्रकाश मेहेत्रे हे तातडीने शुक्रवारी (दि. ३०) सकाळी दुर्घटनाग्रस्त गावात दाखल होत पुरवठा शाखा नायब तहसीलदार उज्ज्वला अंधेरे, मंडळ अधिकारी गुरुनाथ यमाजी, तलाठी विशाल चोरगे यांनी मदत कार्य सुरू केले.

यातील जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र कोकबन येथे उपचार देण्यात आल्यानंतर त्यांना घरी सुखरूप पोहचविण्यात आले आहे.

रोहा तालुक्यात काहीकाळ विसावा घेत पावसाची संततधार सुरूच आहे. गुरुवारी रात्री चणेरा विभागात खांदेरे गावाजवळील नंदप आदिवासीवाडी येथील घरांना या वाऱ्याचा जोरदार फटका सहन करावा लागला. या वाऱ्याने गावातील ३६ घरे व दोन समाजमंदिरांचे नुकसान झाले आहे. यामध्ये घरांच्या झालेल्या पडझडीत निलेश किसन वाघमारे, शशिकांत राजाराम वाघमारे, यशोदा शशिकांत वाघमारे, अस्मिता दिनेश वाघमारे, सुश्मिता शशिकांत वाघमारे हे किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र कोकबन येथे दाखल करीत प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.

घरावरील छप्परच उडून गेल्यामुळे सर्व संसार उघड्यावर आल्याची दखल महसूल प्रशासनाने घेत सर्व प्रथम जिवनावश्यक वस्तू आपत्तीग्रस्तांना दिल्या आहेत. सर्व नुकसानीचे पंचनामे करून शासन नियमांचे प्रमाणे मदत करण्यात येणार असल्याची माहिती अप्पर तहसीलदार प्रकाश मेहेत्रे यांनी दिली आहे.

# प्रशासकीय कार्यक्रमात भाजपला वगळणारे अधिकारी रडारवर

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर येथे नूतन प्रशासकीय इमारतीच्या भूमिपूजन समारंभात शासकीय कार्यक्रम असतानाही भाजप आमदारांना तसेच नेत्यांना डावलल्याने खालापूर भाजप आक्रमक झाले असून, जिल्हा कोषाध्यक्ष सनी यादव यांनी बांधकाम खात्याला यासंबंधी निषेधाचे पत्र देऊन अधिकाऱ्यांना जाब विचारला आहे.



राज्य शासनाने सदर प्रशासकीय इमारतीस १० कोटी रुपये मंजूर केले असून या प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन समारंभ आमदार थोरवे यांच्या हस्ते करण्यात आला. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, मात्र असे असतानाही या कार्यक्रमात भाजप आमदारांना तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांना डावलल्याचा आरोप सनी यादव यांनी दिलेल्या पत्रात केला आहे.

खालापूर तालुक्याचा काही भाग उरण व पनवेल तालुक्याला जोडला असल्यामुळे भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना या कार्यक्रमाचे प्रोटोकॉलप्रमाणे निमंत्रण देणे आवश्यक होते, परंतु उपअभियंता कार्यालयाने जाणीवपूर्वक निमंत्रण दिले नसल्याचा आरोप सनी यादव यांनी दिलेल्या पत्रात नमूद केला असून निषेधही व्यक्त केला आहे.

खालापूर येथील उपअभियंता राखाडे हे कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांच्या वतीने कार्यालयात उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारले. सनी यादव यांच्यासमवेत प्रसाद पाटील व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाडमध्ये पावसामुळे पाणी तुंबण्याचे प्रकार

**महाड : प्रतिनिधी**

गेल्या तीन-चार दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने रस्त्याच्या कडेला साचलेल्या पाण्याच्या निचरा होत नसून यामुळे महाडमध्ये अनेक भागात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली. यामुळे ढोपरभर पाण्यातून नागरिकांना वाट काढत प्रवास करावा लागत आहे.

पावसामुळे दासगाव गावाजवळ पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा योग्य पद्धतीने केली नसल्याने शाळकरी मुलांचेदेखील हाल होत आहेत. नांगलवाडी फाट्यावर असलेल्या एमआयडीसीच्या रस्त्यावरदेखील अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

औद्योगिक क्षेत्रातील अवजड वाहने आणि या परिसरात असलेल्या छोट्या व्यावसायिकांची वाहने ये-जा करण्यास मोठी अडचण निर्माण झाली. येथे असलेल्या हॉटेल गॅरेज आणि गोडाऊनमध्ये देखील हे पाणी शिरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय परिसरामध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचले आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



# रायगड जि. प.ची इमारत रिकामी करण्याचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची मुख्य प्रशासकीय इमारत मशिवतीर्थफ जीर्ण झाल्यामुळे ही इमारत पूर्ण रिकामी करण्याचे निर्देश रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत.

१९७८साली रायगड जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. १९८२साली ही इमारत बांधून तयार झाली होती. तेव्हा या इमारतीतून जिल्हा परिषदेचा कारभार चालविला जात आहे, मात्र आता या इमारतीची पडझड होण्यास सुरवात झाली होती. ही बाब लक्षात घेऊन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठातील स्ट्रक्चरल अभियंत्यांनी इमारतीची पाहणी केली. यानंतर इमारत धोकादायक असव्थेत असल्याचा अंतरिम अहवाल त्यांनी प्रशासनाला सादर केला. त्यामुळे या इमारतीच्या चौथ्या व तिसऱ्या मजल्यावरील कार्यालये रिकामी करण्याचे आदेश दिले होते. काही कार्यालये या इमारतीत सुरू होती. आता सर्व कार्यालये इतर ठिकाणी हलवून ही इमारत पूर्ण रिकामी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेत नवीन इमारत बांधण्याबाबतचा ठराव घेण्यात आला होता. जुनी इमारत पाडून त्याजागी नविन सुसज्ज इमारत बांधण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला होता. त्यामुळे जुनी इमारत पाडून आता नवीन इमारत उभारणीसाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत.

# रायगडातील रातवड येथे पादत्राणे, चर्मोद्योग क्लस्टर

## ▮ केंद्र शासनाकडून १२५ कोटींचा निधी

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाने रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात रातवड येथे चर्मोद्योग क्लस्टरला मंजुरी देऊन १२५ कोटींचा निधी दिला आहे. या माध्यमातून चर्मोद्योगांसाठी एकीकृत सुविधा उपलब्ध होऊन रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे. या प्रकल्पाला मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

केंद्र शासनाच्या भारतीय पादत्राणे, चर्मोद्योग आणि साहित्य विकास कार्यक्रमाच्या उपयोजनेतून पादत्राणे आणि चर्मोद्योगासाठी हा विशाल समूह प्रकल्प साकारण्यात येणार आहे. ३२३ कोटींच्या या प्रकल्पासाठी १२५ कोटी रुपये केंद्र शासनाने मंजूर केले आहेत. उर्वरित पायाभूत सुविधांच्या खर्चाला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. केंद्र सरकारने या प्रकल्पासाठी रायगड जिल्ह्यातील रातवड औद्योगिक क्षेत्राची निवड केली. त्यातून सुमारे २५ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर चर्मोद्योग करणाऱ्या उद्योगांसाठी एकीकृत सुविधा उपलब्ध होणार आहे. लेदर क्लस्टरसाठी महाराष्ट्राची निवड केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाचे आभार मानले आहेत.

## 'उबाठा'चा मोर्चा म्हणजे चोर मचाये शोर!

# मुंबईत आज महायुतीतर्फे जनआक्रोश आंदोलन -ॲड. शेलार

**मुंबई** : उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा शनिवारी निघणारा मोर्चा म्हणजे 'चोर मचाये शोर' असा प्रकार असून स्वतःची पापे लपवण्यासाठी हा मोर्चा काढला जात आहे, अशी टीका करीत मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी मुंबईकरांचा खरा आक्रोश महायुती मांडेल, असे शुक्रवारी (दि. ३०) वांद्रे येथील पत्रकार परिषदेत जाहीर केले. भाजप मोर्चा, महिला मोर्चातर्फे शिवसेना, रिपाइंच्या पाठिंब्यासह ठाकरे गटाच्या मोर्चाला चोख प्रत्युत्तर देण्यात येणार आहे. महायुतीतर्फे मुंबईत दोन ठिकाणी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. नरिमन पॉईंट येथील भाजप प्रदेश कार्यालय आणि दादर स्वामीनारायण मंदिर येथे आक्रोश आंदोलन करण्यात येईल.

### उरण नगरपरिषद, उरण
**जिल्हा - रायगड**

संक्षिप्त देकार निविदा सूचना सन २०२३ - २४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये नगपरिषदांचे कोणतेही कर्तव्य/कार्य अभिकर्ता मार्फत करता येते त्यानुसार उरण नगरपरिषद,उरण,जि.रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या खालील नमूद केलेल्या कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदार यांचेकडून देकार निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | निविदा देकार फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील खाली नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती निष्काशित करून निघणारे सर्व्हीसिबल मटेरियल विकत घेणेकामी देकार सादर करणे. (१) पठाण इमारत, कोटनाका | ५०००/- | ५००/- |

सदर कामी संपूर्ण निविदा/देकार सूचना माहिती उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागात दि. ३-७-२३ पासून उपलब्ध होईल. तरी सर्व इच्छुक योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांनी दि. १२-७- २३ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कामाचे देकार सादर करावे.

**सही/-**
**( राहूल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

**महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन )**

### महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, वेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०
Website: https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmbmaharashtra.gov.in/ceommbgmail.com

**ई निविदा सूचना (सन २०२३-२४)**

Main Portal: https://mahatenders.gov.in
Department Portal: www.mahammb.maharashtra.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी २ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | जीवना,ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे मत्स्यबंदराचा विकास करणे. | १,५५,७५,४१,८१३/- | ७७,८८,०००/- | ५,९००/- | २४ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in आणि www.mahammb.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ३०.०६.२०२३ रोजी १०:०० वा. पासुन उपलब्ध होतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई.**

### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ५२ (ई-निविदा १) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदेमध्ये एकूण ११ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३०.०६.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०७.०७.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : १/०७/२०२३**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

### उरण नगरपरिषद, उरण
**जिल्हा - रायगड**

संक्षिप्त देकार निविदा सूचना सन २०२३- २४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये नगपरिषदांचे कोणतेही कर्तव्य/कार्य अभिकर्ता मार्फत करता येते त्यानुसार उरण नगरपरिषद,उरण,जि.रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या खालील नमूद केलेल्या कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदार यांचेकडून देकार निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | निविदा देकार फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील खाली नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती निष्काशित करून निघणारे सर्व्हीसिबल मटेरियल विकत घेणेकामी देकार सादर करणे. (१) तन्नू अपार्टमेंट इमारत, कोटनाका. | ५०००/- | ५००/- |

सदर कामी संपूर्ण निविदा/देकार सूचना माहिती उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागात दि. ३-७-२३ पासून उपलब्ध होईल. तरी सर्व इच्छुक योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांनी दि. १२-७- २३ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कामाचे देकार सादर करावे.

**सही/-**
**( राहूल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

### उरण नगरपरिषद, उरण
**जिल्हा - रायगड**

संक्षिप्त देकार निविदा सूचना सन २०२३-२४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये नगपरिषदांचे कोणतेही कर्तव्य/कार्य अभिकर्ता मार्फत करता येते त्यानुसार उरण नगरपरिषद,उरण,जि.रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या खालील नमूद केलेल्या कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदार यांचेकडून देकार निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | निविदा देकार फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील खाली नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती निष्काशित करून निघणारे सर्व्हीसिबल मटेरियल विकत घेणेकामी देकार सादर करणे. (१) मिठागर पेठा सहकारी कामगार संघ इमारत, कोटनाका | ५०००/- | ५००/- |

सदर कामी संपूर्ण निविदा/देकार सूचना माहिती उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागात दि. ३-७-२३ पासून उपलब्ध होईल. तरी सर्व इच्छुक योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांनी दि. १२-७- २३ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कामाचे देकार सादर करावे.

**सही/-**
**( राहूल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

### उरण नगरपरिषद, उरण
**जिल्हा - रायगड**

संक्षिप्त देकार निविदा सूचना सन २०२३-२४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये नगपरिषदांचे कोणतेही कर्तव्य/कार्य अभिकर्ता मार्फत करता येते त्यानुसार उरण नगरपरिषद,उरण,जि.रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या खालील नमूद केलेल्या कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदार यांचेकडून देकार निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | निविदा देकार फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील खाली नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती निष्काशित करून निघणारे सर्व्हीसिबल मटेरियल विकत घेणेकामी देकार सादर करणे. (१) मनःशांती इमारत, कोटनाका | ५०००/- | ५००/- |

सदर कामी संपूर्ण निविदा/देकार सूचना माहिती उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागात दि. ३-७-२३ पासून उपलब्ध होईल. तरी सर्व इच्छुक योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांनी दि. १२-७- २३ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कामाचे देकार सादर करावे.

**सही/-**
**( राहूल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

### उरण नगरपरिषद, उरण
**जिल्हा - रायगड**

संक्षिप्त देकार निविदा सूचना सन २०२३ - २४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये नगपरिषदांचे कोणतेही कर्तव्य/कार्य अभिकर्ता मार्फत करता येते त्यानुसार उरण नगरपरिषद,उरण,जि.रायगड यांचेकडून उरण नगरपरिषदेच्या खालील नमूद केलेल्या कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदार यांचेकडून देकार निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | बयाणा रक्कम | निविदा देकार फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील खाली नमूद केलेल्या अतिधोकादायक इमारती निष्काशित करून निघणारे सर्व्हीसिबल मटेरियल विकत घेणेकामी देकार सादर करणे. (१) पी. ओ. बेकरी इमारत, कोटनाका. | ५०००/- | ५००/- |

सदर कामी संपूर्ण निविदा/देकार सूचना माहिती उरण नगरपरिषदेचे बांधकाम विभागात दि. ३-७-२३ पासून उपलब्ध होईल. तरी सर्व इच्छुक योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांनी दि. १२-७- २३ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत सदर कामाचे देकार सादर करावे.

**सही/-**
**( राहूल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

## संपादकीय

# गतिमानतेचे वर्ष

महाविकास आघाडी सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळे खिळखिळी झालेली प्रशासकीय व्यवस्था पुन्हा रूळावर आणून कारभार वेगाने पुढे चालवण्यावरच शिंदे-फडणवीस सरकारने भर दिला आहे. या धबडग्यातच त्यांचे पहिले वर्ष संपले असे म्हणावे लागेल. शिंदे-फडणवीस सरकारचा भर गतिमान निर्णय घेण्यावर राहिला आहे, कारण वाया गेलेली अडीच वर्षे भरून काढण्यासाठी वेगाने काम करणे ही महाराष्ट्राची गरजच होती.

**आपल्या मनात नेमके कुठल्या प्रकारचे सरकार आहे याचा कौल जनता मतदानाद्वारेच देत असते. प्रचार, राजकीय डावपेच, युती वा आघाड्यांचे राजकारण याच्या पलीकडे जाऊन मतदार आपला निर्णय देत असतात. साडेतीन वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या मतदारांनी आपला स्पष्ट कौल भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेच्या युतीला दिला होता. याला बव्हंशी कारणीभूत त्याआधीची पाच वर्षे सेना-भाजप युतीच्या सरकारने केलेले समाधानकारक कामच होते. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली युती सरकारने नेत्रदीपक कामगिरी बजावली होती, पण पाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर जनमताचा कौल धुडकावत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची कास धरली. विश्वासघाताचे हे राजकारण मतदारांच्या वर्मी लागले, परंतु एक वर्षापूर्वी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी धाडस करून वाहावत चाललेल्या पक्षाची नैतिक पडझड थांबवली आणि जनमताचा सन्मान करीत भाजपसोबत सरकार स्थापन केले. गेल्या वर्षभरात बरेच काही घडून गेले आहे. प्रचंड राजकीय उलथापालथींनंतर स्थापन झालेल्या शिंदे-फडणवीस सरकारसमोर अनेक आव्हानांचे डोंगर उभे होते. सर्वप्रथम या सरकारला सर्वोच्च न्यायालयातील तुंबळ लढाई जिंकावी लागली. घटनाबाह्य सरकार किंवा खोके सरकार म्हणून विरोधी पक्ष तुटून पडत होते. त्या नालस्तीची चिखलफेक सहन करीत शिंदे-फडणवीस यांनी आपले सरकार घटनेला धरून व कायदेशीर असल्याचे सर्वोच्च न्यायालयात सिद्ध केले. त्याआधीची अडीच वर्षे महाविकास आघाडी सरकारने अनिर्बंध कारभार केला होता, कारण तिन्ही सत्ताधारी पक्षांचा एककलमी कार्यक्रम होता स्वत:ची खुर्ची बचावणे. या काळात सरकारी यंत्रणा जणू बधीर झाली होती, कारण खुद्द मुख्यमंत्रीच कधी मंत्रालयाकडे फिरकत नव्हते. कोरोना काळात झालेल्या प्रचंड भ्रष्टाचाराची प्रकरणे आता कुठे बाहेर येत आहेत. कोरोना काळानंतरही मुख्यमंत्र्यांनी प्रशासन चालवण्याकडे कधी लक्ष न दिल्याने असंख्य कामे तुंबून राहिली. विद्यमान सरकारकडे सध्या कारभारासाठी फारतर दीड वर्ष शिल्लक आहे, कारण पुढील वर्ष निवडणुकीच्या धामधुमीतच जाणार हे निश्चित. निवडणुकीचे पडघम वाजण्याच्या आत महाराष्ट्राचे गाडे पुन्हा वेगाने दौडवण्यासाठी शिंदे-फडणवीस यांनी जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत आणि त्याची फळेदेखील दिसू लागली आहेत. समृद्धी महामार्ग व्यवस्थितरित्या सुरू झाला आहे. हे या सरकारच्या कारभाराचे पहिले दृश्य स्वरुपातील फळ. शिवडी-न्हावाशेवा प्रकल्प जवळपास पूर्णत्वास गेला असून त्यास अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्याचा निर्णय झाला आहे तसेच वर्सोवा-वांद्रे कोस्टल रोडला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव दिले जाणार आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकाळात उद्योगक्षेत्रात महाराष्ट्र पिछाडीवर गेला होता. औद्योगिक गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्राला क्रमांक एकवर आणून ठेवण्याचे काम शिंदे-फडणवीस यांनी अवघ्या एका वर्षात करून दाखवले ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. गतिमान सरकार हे जनतेच्या मनातले सरकार आहे याची पावती येणाऱ्या निवडणुकांमध्ये मतदार देतीलच.**

# पावसाळी पर्यटनासाठी रायगड जिल्हा खूणावतोय!

रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणचे पांढरेशुभ्र धबधबे, धरणांचे ओव्हरफ्लो होणारे पाणी, डोंगरावरून खळखळत वाहत येणाऱ्या जलधारा पर्यटकांना आकर्षित करतात. जिल्ह्यात सर्वत्र मुसळधार पाऊस बरसला. त्यामुळे पावसाची आणि पाण्याची मज्जा लुटण्यासाठी अनेकजण सज्ज झाले आहेत. त्या अनुषंगाने वर्षासहलीचे बेत आखले जात आहेत. पावसाळी पर्यटनावर असणारे छोटे मोठे व्यावसायिकही सुखावले आहेत.

सह्याद्रीच्या उंच आणि रांगड्या डोंगररांगांनी वेढलेल्या व निसर्गसौंदर्याने नटलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटन म्हणजे पर्यटकांना पर्वणीच असते. जून महिन्यात पाऊस सुरू झाला की पर्यटक, निसर्गप्रेमींना वेध लागतात ते येथील धबधबे, वाहते पाण्याचे प्रवाह व धरणाच्या पाण्यात चिंब भिजण्याचे व मनसोक्त पावसाचा आनंद घेण्याचे. मग त्यांची पावले आपोआप धबधबे, धरणे आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांकडे वळतात. येथील उंचावरून कोसळणारा पाण्याचा प्रवाह, धुक्याचे वातावरण हे सारे अनुभवण्यासारखे असते. पावसाळ्यात येथील अनेक ठिकाणे पर्यटकांनी गजबजलेली असतात. काही दंगेखोर व अतिउत्साही पर्यटकांमुळे पर्यटनाला गालबोट लागते. म्हणून मग जिल्ह्यातील झेनिथ, आषाणे, जुम्मापट्टी, बेडीसगाव आडोशी, बोरगाव, परसदरी आदी धबधब्यांवर, तसेच पाली भुतिवली, कोंढाणे, पळसदरी आदी धरणांवर पर्यटकांना बंदी असते. माणगाव तालुक्यातील देवकुंड येथेही काही दुर्घटना झाल्याने पर्यटकांना बंदी असते. यातील बहुतांश ठिकाणी कलम १४४देखील लावले जाते. अशा वेळी मात्र नेहमीच्या या ठिकाणांपेक्षा काही वेगळे व सुरक्षित स्पॉट्स आहेत जिथे पावसाळ्याचा मनसोक्त आनंद पर्यटक लुटतात.

पावसाळ्यात पर्यटकांचे पाय रायगड जिल्ह्याकडे वळतात ते रायगड जिल्ह्यातील डोंगरावरून कोसळणारे मनमोहक धबधबे पाहण्यासाठी व ओलेचिंब होण्यासाठी. ही मजा काही औरच असते. वीकेण्डला रायगडमधल्या ताम्हिणी घाट, वरंध घाट तसेच खोपोली, कर्जतपासून ते मुरूड फणसाड व अलिबागमध्येही पर्यटक फिरत असतात. मुंबईकरांना ताम्हिणी व वरंध घाट दूरचा असल्याने ते कर्जत, खोपोली तसेच अलिबाग व मुरूडकडील प्रदेशाला विशेष पसंती देतात. अलिबाग व मुरूडची ट्रीप म्हणजे 'डबल धमाका.'





**खबरबात**
**धम्मशील सावंत**

धबधब्यावरून ओलेचिंब होऊन यायचे आणि नंतर समुदावरच्या रेतीमध्ये निवांत बसायचे.

खोपोलीजवळ झेनिथचा धबधबा पर्यटकांना धोकादायक असल्याने बंद करण्यात आला आहे, मात्र त्याचवेळी कर्जत व खोपोलीदरम्यान असलेल्या पळसदरी गावातील हा धबधबा पर्यटकांचे आकर्षण होत चालला आहे. झेनिथपेक्षा हा धबधबा जवळ आहे. मुंबईहून खोपोली लोकल पकडल्यानंतर कर्जत स्टेशनच्या पुढील पहिले स्टेशन पळसदरी लागते. स्टेशनपासून दोन किमी अंतरावर पळसदरी गावाच्या मागे डोंगराच्या कुशीत हा धबधबा आहे. पळसदरी स्टेशनवर जेवणाची सोय नसली तरी गावामध्ये राहण्याची व जेवणाची घरगुती व्यवस्था होते. चुलीवरच्या जेवणाची लज्जत पर्यटकांच्या आनंदात अधिकच भर घालते. धरणाकडे जाताना 'रेल्वे धरण' म्हणून ओळखले जाणारे १९०५ सालचे ब्रिटिशकालीन धरण पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. या धरणावरून गावाकडे रस्ता जातो. गावात विनंती केल्यास जेवणाची व्यवस्था केली जाते. अलिबाग व मुरूड येथील फणसाड अभयारण्यातील धबधबेदेखील पर्यटकांचे आकर्षण होत चालले आहेत. अलिबागपासून ३० किमी व मुरुडपासून २० किमीवर असलेल्या फणसाड अभयारण्यातील धबधब्यांनाही पर्यटक भेट देतात. धबधब्यात भिजण्याच्या मजेबरोबरच अभयारण्याची सैर करता येते तसेच मुरूड व काशीदच्या समुदकिनाऱ्यावरही भटकंती करता येते. फणसाडमध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था विनंतीवरून होते.

धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यापेक्षा जिल्ह्यातील सुरक्षित धबधबे, ओढे व धरणे येथे पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक पसंती देतात. येथील धरणांच्या ओसंडून वाहणाऱ्या पाण्यात मौजमजा घेण्यासाठी पर्यटक येथे गर्दी करीत आहेत. रविवारी व सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे येत असतात. थोडी खबरदारी व अतिउत्साह टाळल्यास शाळकरी, लहान मुले, महिला व तरुणांसाठी ही ठिकाणे सुरक्षित आहेत.

माणगाव पोलीस ठाणे हद्दीतील रवाळजे दूरक्षेत्र अंतर्गत भिरा गावचे हरीतील देवकुंड धबधबा व सणसवाडी गाव हद्दीतील सिक्रेट पॉईंट व ताम्हिणी घाट हा परिसर पावसाळी हंगामात पुणे-मुंबई व महाराष्ट्रातील पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे.

ही ठिकाणे नैसर्गिक दुर्गम भागात असल्यामुळे तेथे कोणत्याही सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. सन २०१७ पावसाळी हंगामात या ठिकाणी भेट दिलेल्या पर्यटकांमधील चार पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहत जाऊन मृत्युमुखी पडले होते तसेच सुमारे ५५ पर्यटक हे अचानक पाण्याचा जोर वाढल्याने नदीपात्रात अडकले होते. सन २०१८च्या पावसाळी हंगामातदेखील फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १४४ अन्वये मनाई आदेशाची मुदत संपल्यानंतर तीन पर्यटक हे नदीच्या प्रवाहात वाहून गेले होते व मृत्युमुखी पडले होते.

सन २०२२मध्ये एक पर्यटक नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने पाण्यात वाहून जाऊन मयत झाला आहे. त्याचबरोबर सिक्रेट पॉईंट या ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचा अभाव असल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. ताम्हिणी घाट हा धोकादायक वळणांचा व तीव्र उताराचा असल्याने तसेच दरड कोसळण्याची संभवता असल्याने पर्यटकांची वित्त व जीवित हानी होऊ शकते. या कारणांमुळे देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट व ताम्हिणी घाट ही पर्यटनस्थळे पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित नसल्याने पोलीस निरीक्षक या परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३चे कलम १४४ अन्वये १० जून ते ३१ ऑक्टोबर या कालावधीसाठी मनाई आदेश जारी केला आहे.

दरम्यान, पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करणे किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्या जागेवर मद्य सेवन करणे असे प्रकार घडतात. त्याचबरोबर पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, धरणांचे कठडे, धोकादायक वळणे, इ. ठिकाणी सेल्फी काढणे व कोणत्याही स्वरूपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, पावसामुळे वेगाने वाहणारे धोकादायक पाण्यात/खोल पाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे, धबधब्याच्या वरील बाजूला जाणे अथवा धबधब्याच्या धोकादायकरित्या पडणाऱ्या पाण्याच्या झोताखाली बसणे, धोकादायक स्थिती निर्माण होईल अगर जिवित हानी होईल असे धबधबे किंवा तलाव या ठिकाणी पाण्यात उतरणे, रहदारीच्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबवणे, वाहने अतिवेगाने व वाहतूक निर्माण होईल अशा प्रकारे चालविणे, बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकादायक स्थितीत ओव्हरटेक करणे असेही घडते. शिवाय सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टिकच्या बाटल्या, थर्माकोलचे व प्लास्टिकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे, सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड काढणे, टिंगलटवाळी करणे, असभ्य वर्तन व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजवणे, डीजे सिस्टिम वाजवणे, ध्वनिप्रदूषण करणे अशा प्रकारचे वर्तन करण्यास प्रशासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे वर्षासहलीसाठी जा, पण जरा जपून!



## बदलते तंत्रज्ञान

# स्लो झालेला स्मार्टफोन 'या' स्टेप्स वापरून करा सुपरफास्ट



स्मार्टफोनची सर्वांत मोठी समस्या म्हणजे ते स्लो होणे. दरम्यान, फोनचा वेग कमी झाला तर फोन वापरण्यात मजा येत नाही. आपली कितीतरी कामंही खोळंबतात. अनेक वेळा फोनचे स्टोरेज भरल्यामुळेही फोन स्लो होतो. आता जर तुम्हालाही स्टोरेजची समस्या भेडसावत असेल किंवा फोनसारखा स्लो होत असेल तर आम्ही तुम्हाला काही सिंपल ट्रिक सांगत आहोत, ज्यामुळे फोनचे स्टोरेज मोकळे होईलच शिवाय तुमचा फोनही सुपरफास्ट होईल.

तुम्हाला फक्त तुमच्या फोनवर कोणते ॲप्स जास्त जागा घेत आहेत हे आधी शोधायचं आहे. जर तुम्हाला हे कसं करायचे हे माहित नसेल तर आम्ही आम्ही तुम्हाला सोपी पद्धत सांगतो. हे काम Android आणि iOS फोनमध्ये कसे करायचे तेदेखील जाणून घेऊ...

तुमच्या फोनवर कोणते ॲप सर्वाधिक जागा घेतातम तुम्ही तुमच्या iPhone किंवा Android स्मार्टफोनच्या Settingsमध्ये जाऊन हे शोधू शकता.

तुमच्या iPhone वर कोणते ॲप्स सर्वाधिक स्टोरेज वापरत आहेत हे शोधण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा:

तुमच्या iPhoneवर सेटिंग्ज ॲपवर जा. जनरल पर्यायावर टॅप करा. आता, आयफोन स्टोरेज पर्यायावर क्लिक करा आणि नंतर ॲप्स सूचीवर जा. येथे तुम्हाला सर्वांत जास्त जागा घेणारे ॲप्स दिसतील. आता उपयोगी नसलेले ॲप्स डिलीट करा.

Android स्मार्टफोनमध्ये पुढील स्टेप्स फॉलो करा


Google Play Store ॲपवर जा आणि प्रोफाइल चिन्हावर टॅप करा. येथे मॅनेज ॲप्स आणि डिव्हाइसवर क्लिक करा. येथे तुम्हाला ॲप्स दिसतील जे साईजच्या आधारावर सूचीबद्ध केलेले असतात. याशिवाय, तुम्ही सर्वात जास्त जागा वापरणारे ॲप्स देखील तपासू शकता. ते कामाचे नसल्यास ते हटवा. यामुळे जागा मोकळी होईल.

वरील सर्व गोष्टी केल्यावर फोन मोकळा होईल आणि आपोआपच फास्ट चालायला लागेल.

# आज राष्ट्रीय डॉक्टर दिन

दैनंदिन जीवनात मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त राहण्यासाठी डॉक्टरांकडून अनेक सल्ले दिले जातात. कोरोना महामारीच्या काळात तर डॉक्टर आपल्यासाठी देवदूतच ठरले होते. स्वतःचा जीव धोक्यात घालून आणि प्रतिकूल परिस्थितीत आपल्या रुग्णाचा जीव कसा वाचविण्याचा प्रयत्न करतो हे सर्वांनी पाहिले. प्रत्येक डॉक्टर आपल्या रुग्णांना सर्वोत्तम आरोग्यसेवा पुरवतो याची खात्री करतो. इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे दरवर्षी १ जुलै रोजी 'राष्ट्रीय डॉक्टर दिन' साजरा केला जातो.

बंगालचे माजी मुख्यमंत्री डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या स्मरणार्थ १ जुलै १९९१ रोजी भारतात प्रथमच राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा करण्यात आला. मानवतेच्या सेवेत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. डॉ. रॉय हे उत्तम डॉक्टर होते. शिक्षक असण्यासोबतच ते सक्रिय सामाजिक कार्यकर्तेही होते. त्यांनी १४ वर्षे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणूनही काम केले. डॉ. रॉय यांचा जन्म १ जुलै १८८२ रोजी झाला. त्यांचा सन्मान करण्यासाठी त्यांच्या वाढदिवसा निमित्ताने म्हणजेच १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर्स दिन



**निमित्त**

साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. योगायोगाने त्यांचेही १ जुलै (१९६२) रोजी निधन झाले. या दृष्टीने त्यांना श्रद्धांजली म्हणून काही लोक राष्ट्रीय डॉक्टर दिनही साजरा करतात. डॉ. बी. सी. रॉय यांना ४ फेब्रुवारी १९६१ रोजी भारतरत्न किताबही देण्यात आला होता.

डॉक्टर्स डे वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या तारखांना साजरा केला जात असला तरी तो साजरा करण्याची पद्धत कमी-अधिक प्रमाणात सारखीच आहे. या दिवशी डॉक्टरांना ग्रीटिंग कार्ड देऊन सन्मानित केले जाते. या दिवशी, डॉक्टर त्यांच्या रुग्ण आणि त्यांच्या जवळच्या आणि प्रियजनांसोबत एखाद्या विशिष्ट आजाराच्या विषयावर सेमिनार आयोजित करतात आणि त्यांना विशिष्ट रोगाबद्दल तपशीलवार सांगतात.

कोविड-१९नंतर डॉक्टरांचे महत्त्व शब्दात मांडता येणार नाही. मरणासन्न रुग्णाला नवजीवन देणाऱ्या डॉक्टरांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय डॉक्टर दिन साजरा केला जातो. कोविड काळात डॉक्टर आणि त्यांचे सहकारी १० ते १५ दिवस सतत रुग्णालयात राहून जीव धोक्यात घालून रुग्णांचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या जीवाची पर्वा न करता, जगातील डॉक्टरांनी ज्या भावनेने आणि समर्पणाने रुग्णांची सेवा केली, त्यांना देवाच्या बरोबरीने ठेवून त्यांचा आदर करणे कदाचित पूर्ण होणार नाही.

भारतात प्रथमच १९९१ साली राष्ट्रीय डॉक्टर्स डे साजरा करण्यास सुरुवात झाली. या वर्षी केंद्र सरकारने प्रथमच डॉक्टर्स डे साजरा केला. डॉक्टरांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्याची सुरुवात झाली. त्यांचे नाव होते डॉ.बिधान चंद्र रॉय. त्यांचे यानिमित्ताने स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करूया!

**(साभार : इंटरनेट)**


**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : दमदार पावसामुळे चविष्ट व गुणकारी राजभाज्या विक्रीस आल्या आहेत. यातून आदिवासींना रोजगार उपलब्ध झाला आहे.**

## आरोग्य प्रहर

# डोकेदुखीवर 'हे' उपाय देतील काही मिनिटांत आराम



डोकेदुखी ही एक सामान्य समस्या आहे, जी कोणालाही होऊ शकते. उन्हाळ्यानंतर सुरू झालेल्या पावसाळ्यामुळे लोकांना खोकला, सर्दी, डोकेदुखीचा त्रासही होतो. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी लोक ताबडतोब औषधे घेतात, पण जर तुम्ही अशा लोकांपैकी असाल ज्यांना किरकोळ समस्यांसाठी औषधे घेणे आवडत नसेल तर तुम्ही या घरगुती उपायांचा वापर करून डोकेदुखीवर मात करण्याचा प्रयत्न करू शकता. हे उपाय तुम्हाला काही मिनिटांत आराम देऊ शकतात. जाणून घेऊया काय आहेत हे घरगुती उपाय आणि त्यांचा वापर कसा करावा.

**तुळस :** तुळशीच्या पानांचे सेवन केल्याने मेंदूला आराम मिळतो. एक कप पाण्यात तुळशीची तीन-चार पाने थोडा वेळ उकळून घ्या. त्यात थोड्या प्रमाणात मध घाला आणि नंतर चहासारखा प्या. दुसरा उपाय म्हणजे तुळशीची पाने चावून खाणे.

**गरम पाण्यात लिंबू :** हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. यासाठी एक ग्लास कोमट पाणी घेऊन त्यात लिंबाचा रस मिसळून प्यावा. डोकेदुखी काही मिनिटांतच दूर होईल. अनेकदा पोटात गॅस झाल्याने डोकेदुखी होते आणि अशा वेळी हा घरगुती उपाय अत्यंत प्रभावी ठरतो.

**आले :** आल्याने डोक्यातील रक्तवाहिन्यांची जळजळ कमी होण्यास मदत होते. त्याच्या वापराने डोकेदुखी कमी होते. यासाठी आल्याचा रस आणि लिंबाचा रस समप्रमाणात मिसळून दिवसातून एक किंवा दोनदा प्यावा. याशिवाय आल्याची पावडर किंवा कच्चे आले पाण्यात उकळून त्या पाण्याच्या सूर्यप्रकाशातून काही मिनिटे वाफवून घेतल्यासही आराम मिळतो.

**पुदिना :** पुदिन्याचा रस डोकेदुखीतही खूप फायदेशीर आहे. पुदिन्यात आढळणारे मेन्थॉल आणि मेन्थॉल हे घटक डोकेदुखीपासून तात्काळ आराम देतात. पुदिन्याची काही पाने घेऊन त्याचा रस कपाळावर लावावा. यामुळे काही मिनिटांतडोकेदुखी कमी होईल.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# अलिबागच्या लाल परीला प्रवाशांची पसंती

## उन्हाळी हंगामात चार कोटींचे उत्पन्न; साडेआठ लाख जणांचा प्रवास

**अलिबाग : रामपहर वृत्त**

उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी अलिबाग एसटी बस आगारामार्फत एसटीच्या नियमीत फेऱ्यासह ज्यादा फेऱ्यांची सुविधा ठेवली होती. मे महिन्यात सुमारे आठ लाख ४३ हजार प्रवाशांनी प्रवास केला. यातून एसटीला सुमारे चार कोटी ४० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाल्याची माहिती आगार व्यवस्थापक अजय वनारसे यांनी दिली.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी जिल्हा व तालुका स्तराव सरकारी कार्यालये आहेत. शाळा, कॉलेज, खासगी कार्यालये आहेत. त्याचप्रमाणे या ठिकाणी पर्यटनस्थळांवरही पर्यटक मोठ्या संख्येने भेटी देत असतात. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी अलिबाग एसटी बस आगाराचे व्यवस्थापक अजय वनारसे यांनी उन्हाळी सुट्टीच्या दिवशी ज्यादा एसटी बसेसचे नियोजन केले होते. विशेष म्हणजे विनाथांबा पनवेलवर अधिक भर दिला होता.



मे महिन्याच्या कालावधीत एकूण सात लाख ८१ हजार किलोमीटरचा प्रवास एसटी बसने केला. बसमधून सुमारे आठ लाख ४३ हजार प्रवाशांनी प्रवास केला. त्यात तीन लाख ४८ हजार महिला प्रवाशांचा सहभाग होता. एकूण ४१ टक्के महिलांनी एसटीतून प्रवास केला. प्रवाशांकडून मिळालेल्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे अलिबाग एसटी बस आगाराला चार कोटी ४० लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. तीन वर्षानंतर पहिल्यांदा एसटीला फायदा झाला आहे.

अलिबाग एसटी बस आगारात ६८ एसटी बसेस आहेत. त्यात १८ शिवशाही बसेस आहेत. पावसाळा सुरू झाला आहे. पावसाळ्यात बस गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी वेदर स्ट्रीप बसविण्यात आली आहे. नादुरुस्त असलेल्या खिडक्या दुरुस्त करण्याचे काम केले आहे. तरीदेखील काही बिघाड असल्यास ते तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना तांत्रिक विभागाला दिल्या असल्याची माहिती एसटी बस आगारातून देण्यात आली आहे.

**महिलांसाठी राबविण्यात आलेल्या अर्धतिकीट योजनेमुळे प्रवासी संख्येतदेखील प्रचंड वाढ झाली. मे महिन्यामध्ये रजेवर नियंत्रण ठेवण्यात आले. चालक वाहक, तांत्रिक कर्मचारी आदींनी घेतलेली मेहनत व योगदानामुळे प्रवाशांना चांगली सेवा देता आली.**

**–अजय वनारसे, आगार प्रमुख**

## मनश्री पवारच्या कवितेला सर्वोत्कृष्ट पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघ आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने साप्ताहिक कोकणनामा दिवाळी अंकात मनश्री उल्हास पवार हिच्या 'आई–बाबा' या कवितेला नुकताच सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळाल्याबद्दल स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचच्या वतीने कौतुक सोहळ्याचे आयोजन केले होते.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, मंचाचे अध्यक्ष सखाराम पवार, कार्याध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार–साहित्यिक उमाजी केळुसकर, कार्यवाह, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्रीरंग घरत, माजी नगरसेवक आर. के. घरत, जिल्हा रक्तपेढी तंत्रज्ञ हेमकांत सोनार, जिल्हा ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, नाट्य–चित्र अभिनेते शरद कोरडे, चारुशिला कोरडे, नाट्य अभिनेते जगदीश नागे, मराठा समाज नेते उल्हास पवार, ॲड. राजेंद्र जैन, मनश्री उल्हास पवार, सेजल संतोष पाटील, वेणू घरत, साक्षी काठे आदी उपस्थित होते.

माहिती अधिकारी मनोज सानप यांनी मार्गदशन करताना म्हटले की, प्रवाहाविरुद्ध निष्ठेने काम केले, तर त्यातून वेगळे मानसिक समाधान मिळते. त्यातूनच आपण आपल्या कामाचा ठसा उमटवू शकतो. मनश्री पवार हिने आई–बाबा या कवितेचे वाचन करून उपस्थितांमध्ये आई–बाबांविषयी प्रेम आणि आदरभाव आपल्या कवितेच्या माध्यमातून सांगून उपस्थितांची मने जिंकली.

## अतिवृष्टीमुळे गांधे येथील दोन घरांचे नुकसान

**नागोठणे** : गेले चार–पाच दिवस सतत पडत असलेला मुसळधार पाऊस व सोसाट्याचा वारा यामुळे शिहू ग्रामपंचायत हद्दीतील गांधे येथील पांडुरंग पांचाळ व उमेश गदमले यांच्या घराचे छप्पर उडून नुकसान झाले आहे. सुदैवाने यात जीवितहानी जरी झाली नसली तरी मोठया प्रमाणात वित्तहानी झाली आहे.

सोसाट्याचा वारा व पाऊस यामुळे गांधे येथील दोन घरांचे बुधवारी (दि. २८) रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान नुकसान होऊन घरातील धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते अनंत भुरे यांनी तत्काळ भेट घेऊन तहसीलदार पेण, तलाठी शिहू यांच्याशी संपर्क साधला. याबाबत त्वरित पंचनामा करून नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदत मिळावी, अशी मागणी केली आहे, तसेच कुटुंबाला मदतीचा हात म्हणून जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी आर्थिक मदत केली.




सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**अंतिम नगर रचना परियोजना नैना क्र.३,**
**(चिपळे, कोप्रोली, विहीघर,नेरे,नेरेपाडा,मोहो),**
**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) सहित महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना नियोजन अधिनियम,१९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)**

क्रमांक लवाद/नरयो –३/नैना/अंतिम/निवाडा/२०२३/८९८ ज्याअर्थी, प्रारुप नगर रचना परियोजना नैना क्र.३, (चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/ १७/नवि–१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये, त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ चे पोट- कलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/टिपीएस–३/प्रा.यो./ २०१९/१२९९/SAP/११४४, दिनांक १ नोव्हेंबर २०१९ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण, भाग–१ मधील पृष्ठ १ ते ७ वर दिनांक १ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम च्या पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने निवृत्त उपसंचालक, नगर रचना श्री. सु. व. सुर्वे यांची दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ च्या अधिसूचना क्र. टीपीएस–१२१९/१५२४/प्र.क्र.६४/१९/नवि–१२, अन्वये वर उल्लेखलेल्या मंजूर प्रारुप परीयोजनेसाठी लवाद म्हणून नेमणूक केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३(१) अन्वये महाराष्ट शासन राजपत्र असाधारण, भाग–२ मध्ये दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी सूचना लवाद यांनी प्रसिद्ध करुन प्रारुप नगर रचना परियोजना, नैना क्र.३, (चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ८ जानेवारी २०२० पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगर रचना परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पुर्ण करुन त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (३) अन्वये नगर रचना परीयोजना, नैना क्र.३ , (चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो) ची सदर लवाद यांनी त्यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ च्या लवाद, नरयो–३/उपविभागणी/२०२२/५६९ च्या सुचनेप्रमाणे प्रारंभिक परीयोजना व अंतिम परीयोजना अशी विभागणी दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजी केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांमधील नियम क्र. १३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट–कलम (४) व (६) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

आणि ज्याअर्थी त्यानंतर लवाद यांनी प्रारंभिक नगर रचना परियोजना नैना क्र. ३ तयार करुन शासनास विहीत मुदतीत सादर केली होती व उक्त प्रारंभिक नगर रचना परियोजना शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ च्या अधिसूचना क्रमांक टीपीएस–१२२२/२१८६/प्र.क्र.१५१/२२/न.वि–१२ अन्वये उक्त अधिनियमांच्या कलम ८६(१) अन्वये मंजूर केली आहे.

त्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट- कलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे असे जाहीर करीत आहेत की, आता अंतिम नगर रचना परियोजना नैना क्र.३, ( चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो) ही ३१ मे २०२३ रोजर विहीत मुदतीत तयार करण्यात आली आहे.

ही अंतिम परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्याकडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या जमिनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीड बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच या तयार करण्यात आलेल्या अंतिम नगर रचना परीयोजनेतील तपशील सर्व जमिन मालकांना योग्य वेळी नमुना क्र. ५ प्रमाणे कळविण्यात येणार आहे.

**पत्ता– नैना कार्यालय, टॉवर नं. १०,**
**आठवा मजला,बेलापूर रेल्वे स्टेशन,**
**सीबीडी बेलापूर–नवी मुंबई,४००६१४**
**दिनांक – ३०/०५/२०२३**

**सु. व. सुर्वे**
**लवाद**
**नगर रचना परियोजना, नैना–३**
**(चिपळे, कोप्रोली, विहीघर, नेरे, नेरेपाडा, मोहो)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१७४/२०२३-२४



## नमुना –१

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

**उपविभागीय अधिकारी महाड यांचे**
**कार्यालय ता. महाड, जि. रायगड**
**दिनांक : १९/०६/२०२३**

**क्रमांक :– भूसंपादन/कात–५/परसुले /थेजख/नोटीस/११९७/२०२३**

ज्याअर्थी, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड – अलिबाग यांनी मौजे गोळेगणी व पैठण लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे परसुले या गावातील बुडीत क्षेत्रासाठी खाजगी जमिनी, लघुपाटबंधारे योजना गोळेगणी – पैठण ता. पोलादपूर, जि. रायगड या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण–०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जि. रायगड यांजकडे पत्र नं. जा.क्र.मृद.व.ज.सं.वि/रा/ प्रशा/ १०२३/सन २०२२, दिनांक २८/११/२०२२ अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक भूसंपादन/ टे–६/ मौजे परसुले/२०२२ दिनांक ३०/११/२०२२ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ–२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी डॉ. ज्ञानोबा वानापूरे, उपविभागीय अधिकारी महाड याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड– अलिबाग यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.
२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल –१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.
३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड– अलिबाग यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.
४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड– अलिबाग यांचेकडे दाखल करावीत.
५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड– अलिबाग यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.
६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड– अलिबाग, यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची – १**
**मौजे परसुले, ता. पोलादपूर, जि. रायगड**

| अनु. | गट नं. | खरेदी करावयाचे संपादनाचे क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ८५५ | ०.०१०० | ०.०१ |
| २ | ८५७ | ०.००.१० | ०.०१ |
| ३ | ८६२ | ०.००.५० | ०.०१ |
| ४ | ८६३ | ०.२९.०० | ०.०६ |
| ५ | ८६४ | ०.६७.०० | ०.२१ |
| ६ | ८६५ | ०.५८.०० | ०.१७ |
| ७ | ८६६ | ०.५४.०० | ०.११ |
| ८ | ८६७ | ०.८८.०० | ०.१९ |
| ९ | ८६८ | ०.६७.०० | ०.२६ |
| १० | ८६९ | ०.५३.०० | ०.१३ |
| ११ | ८७० | ०.३२.०० | ०.११ |
| १२ | ८७१ | ०.६६.०० | ०.२३ |
| १३ | ८७२ | ०.९४.०० | ०.२९ |
| १४ | ८७३ | ०.८५.०० | ०.१२ |
| १५ | ८७४ | ०.३७.३९ | ०.०७ |
| १६ | ८७५ | ०.१३.५२ | ०.०१ |
| १७ | ८८१ अ | ०.०७.२० | ०.०१ |
| १८ | ८८२ अ | ०.१०.७४ | ०.०५ |
| १९ | ८८३ अ | ०.०८.८६ | ०.०४ |
| २० | ८८४ | ०.०८.३० | ०.२९ |
| २१ | ८८५ अ | ०.३२.७९ | ०.०६ |
| २२ | ८८६ अ | ०.०२.६८ | ०.०१ |
| २३ | ९०१ | ०.०३.०० | ०.०१ |
| २४ | ९०२ | ०.०७.७० | ०.०१ |
| २५ | ९०३ | ०.०८.१३ | ०.०१ |
| २६ | ९०४ | ०.०८.२५ | ०.०१ |
| | **एकूण** | **०८.४३.१६** | |

**ठिकाण : महाड**
**दिनांक : १९/०६/२०२३**
**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/५८/९२७/२०२३**

**सही/–**
**(डॉ. ज्ञानोबा वानापुरे)**
**उपविभागीय अधिकारी**
**महाड उपविभाग महाड**

## निवडक

### घरफोडीत २० तोळे सोन्याची चोरी

**पनवेल :** कुटुंब झोपल्याची संधी साधून चोरट्यांनी घरातील २० तोळे सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारला. तळोजा पोलीस ठाणे हद्दीतील खुटारी गावात राहणारे जगदीश म्हात्रे यांच्या घरात चोरट्यांनी चोरी केली. पनवेल-मुंब्रा मार्गावर असलेल्या खुटारी गावातील जगदीश म्हात्रे यांचे कुटुंब रात्री जेवण करून नेहमीप्रमाणे झोपले होते. या वेळी चोरट्यांनी कपाटातील गंठण, बांगड्या, कर्णफुले, सोनसाखळी असे जवळपास २० तोळ्याचे दागिने चोरून पळ काढला. सकाळी कुटुंबीय जागे झाल्यावर घराचा दरवाजा उघडा आणि कपाटातील साहित्य विखुरलेले दिसून आले. पाहणी केली असता सर्व दागिने चोरून नेल्याचे समजले.

### पनवेलमध्ये आढळला अनोळखी मृतदेह

**पनवेल :** शहरातील पनवेल वाईन शॉपच्या बाजुला एका ३० ते ३५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. पनवेल शहर पोलीस मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. त्याचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे असून तो रंगाने सावळा, उंची पाच फूट सहा इंच, केस काळे, चेहरा उभट, मिशा दाढी तसेच अंगात हाफ गुलाबी टी शर्ट व चॉकलेटी हाफ पॅन्ट असा पेहराव घातला आहे. या व्यक्तीबाबत किंवा त्याच्या नातेवाइकांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक एन. एन. जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उरण महाविद्यालयात शाहू महाराज जयंती



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते मा. दिनेश सासवदे (तुकाराम हरी वाजेकर कनिष्ठ महाविद्यालय, फुंडे) हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम गायकवाड हे होते. सूत्रसंचालन डॉ. एम.जी. लोणे यांनी तर आभार डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी मानले. या वेळी रमेश ठाकूर (सदस्य, महाविद्यालय विकास समिती) प्रा. के. ए. शामा, डॉ. ए. आर. चव्हाण, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल :** ईदनिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकार वसीम पटेल यांना शुभेच्छा दिल्या.

# आषाढी एकादशीचा नवी मुंबईत उत्साह

## महापालिका क्षेत्रात विद्यार्थ्यांची स्वच्छता दिंडी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता कार्यामध्ये लोकसहभागावर भर देत विविध उपक्रम राबविण्यामध्ये नवी मुंबई महापालिका नेहमीच आघाडीवर राहिली असून महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर बेलापूर विभागात करावेगाव परिसरात स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई महानगरपालिका आणि ज्ञानदीप सेवा मंडळाचे प्राथमिक, माध्यमिक विद्यालय, करावे यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या 'आषाढी एकादशी स्वच्छता दिंडी'मध्ये सहभागी २५०हून अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनींनी ज्ञानोबा माऊली तुकाराम तसेच विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल या नामघोषासह स्वच्छतेचे संदेश प्रसारित करीत निश्चय केला, नंबर पहिला घोषणेने सारा परिसर दुमदुमून टाकला. शाळेच्या पटांगणापासून सुरू झालेली ही स्वच्छता दिंडी करावे, नेरूळ परिसरात साधारणत: दीड किमी फिरून पुन्हा शाळा पटांगणात नामाचा गजर करीत परतली.

स्वच्छता ही आपल्या नवी मुंबई शहराची ओळख असून या नावलौकिकात येथील नागरिकांच्या सक्रिय सहभागाचा फार मोठा वाटा आहे. स्वच्छताविषयक अनेक उपक्रमांमध्ये नागरिक स्वयंस्फुर्तीने सहभागी होत असतात. त्यातही महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा जपणाऱ्या आषाढी दिंडीला स्वच्छतेची जोड देऊन ज्ञानदीप सेवा मंडळाच्या शाळेतील मुख्यध्यापक व शिक्षकांनी पुढाकार घेत स्वच्छता दिंडीचे आयोजन केले ही प्रशंसनीय गोष्ट असल्याचे मत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी व्यक्त केले.

नवी मुंबईचे भविष्य असणाऱ्या पुढच्या पिढीने विद्यार्थी मुलामुलींनी या स्वच्छता दिंडीत इतक्या मोठया संख्येने उत्साहाने सहभाग घेतला त्याबद्दल डॉ. बाबासाहेब राजळे यांनी कौतुक केले.

या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्यासमवेत, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे, स्वच्छता अधिकारी विजय नाईक तसेच स्वच्छता निरीक्षक व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. ज्ञानदीप सेवा मंडळाची प्राथमिक शाळा मराठी माध्यम मुख्याध्यापक बंकट तांडेल व इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल आणि संस्था कार्यकारिणी सदस्य हरिश्चंद्र तांडेल तसेच इतर शिक्षकवृंद, शालेय कर्मचारी व २५०हून अधिक विद्यार्थ्यांनी दिंडीत सहभागी होत हरीनामासह स्वच्छतेचा गजर केला.



### कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती

*आषाढी एकादशी निमित्त ज्ञानदीप प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा झाला. विधार्थी विठ्ठल-रुक्मिणी ज्ञानेश्वर, तुकाराम या संतांच्या पारंपरिक वेशभुषेत आले होते. ज्ञानदीपच्या पालखी सोहळ्यात नवी मुंबई महापालिकाच्या स्वच्छता अभियानाचे संदेश आणि ओला सुका कचरा याबाबत घोषणा विद्यार्थी देत होते.*



**नवी मुंबई :** घणसोली येथील आदर्श सोसायटीत आषाढी एकादशीचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात झाला.

या वेळी घणसोलीतील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केलेली पहावयास मिळाली. श्री गणेश विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने भाविकांना उपवासाचा चिवडा आणि केळी यांचे वाटप करण्यात आले.

मंदिर समितीच्या वतीने सकाळी ६ वाजता अभिषेक व आरतीच्या नंतर घणसोली ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वतीने घणसोली साईबाबा मंदिर ते आदर्श सोसायटी विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत माऊलींच्या जयघोषात पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सोसायटीमधील मंदिर समितीचे रघुनाथ काते, दत्तात्रय कुंभार, अजय चव्हाण, चंद्रशेखर करंडे आणि आदर्श सोसायटीमधील सर्व रहिवासी यांनी मोलाचे सहकार्य केले.



**नवी मुंबई : सानपाडा येथील साई भक्त सेवा मंडळ व साई भक्त महिला फाउंडेशन आयोजित आषाढी एकादशी दिंडी सोहळा २०२३निमित्त गुरुवारी भगवंत पांडुरंगाचे आमदार मंदा म्हात्रे यांच्यासह पांडुरंग आमले, शारदा आमले, चिंतामण बेल्हेकर, श्रीपद पत्की आदींसह मोठ्या संख्येने नागरिकांनी दर्शन घेतले.**

## दिंडीतून पाणी वाचवा संदेश

**उरण : वार्ताहर**

आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात, आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेल्या दिंडी सोहळ्यात पाणी वाचविण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी येथील नागरिकांना दिला.

पाणी वाचवा, पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा असा संदेश देणारे फलक हाती घेऊन, शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दिंडीतून जनजागृती केली.

या दिंडीत लेझिम, झांज, टाळ, ताशा व ढोल पथकांची जुगलबंदी पाहायला मिळाली. दिंडी सोहळ्याला ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता म्हात्रे, प्राचार्य राजेंद्र म्हात्रे, संदेश महाविद्यालयाच्या प्राचार्या सुखदा म्हात्रे, चिहाटे मॅडम, मुख्याध्यापक सुभाष ठाकूर, प्रवीण चिर्लेकर, विद्याधर गावंड, निवास गावंड, देवेश म्हात्रे, तसेच अन्य शिक्षक उपस्थित होते.



## वाशी रेल्वे स्टेशनजवळील रस्त्याचे लोकार्पण



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा-पामबीचमधील शेकडो ज्येष्ठ नागरिकांसह इतर नागरिकांनी सिडकोविरोधात माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या नेतृत्वाखाली सिडको कार्यालयाबाहेर केले होते. या आंदोलनानंतर सिडकोने सानपाडा येथील नागरिकांना देण्यात येत असलेल्या पायाभूत सुविधा देण्याचे मान्य केले होते.

त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या वाशी रेल्वे स्टेशन पूर्वेकडील सर्व्हिस रस्त्याचा लोकार्पण सोहळा बुधवारी (दि. २८) नागरिकांच्या उपस्थितीत झाला. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यानंतर हा रस्ता वाहतूक आणि नागरिकांना रहदारीसाठी खुला करण्यात आला. गुरुवारपासून या ठिकाणी प्रवासी नागरिकांना वाहनांच्या पार्किंगची सुविधा निर्माण झाली आहे तर नव्याने उपलब्ध करून दिलेले रिक्षा स्टॅन्ड हे रेल्वे स्टेशनच्या अगदी बाहेरील ठिकाणी झाल्याने नागरिकांना सोईचे झाले आहे.

वाशी रेल्वे स्टेशनच्या पूर्वेकडील बाजूस सानपाडा-सोनखार परिसरातील सेक्टर १,१३ ते १९ मधील नागरिकांना रेल्वे प्रवासाच्या निमित्ताने दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी पार्किंगसाठी जागा, ऑटो स्टॅंड, सुरळीत रस्ता-पदपथ, पोलीस बिट चौकी व इत्यादी मूलभूत सोयी सुविधा मिळाव्यात, यासाठी तत्कालीन नगरसेवक दशरथ भगत व त्यानंतर नगरसेविका वैजयंती भगत यांनी सिडको प्रशासनास सातत्याने पत्रव्यवहार करून, तसेच सिडकोविरोधात सिडको भवनासमोर एकदिवसीय उपोषण आंदोलन करून वरील विकासकामे मंजुरी करून घेतली.

वाशी रेल्वे स्टेशन पूर्वेकडील या सर्व्हिस रस्त्यासह अन्य पायाभूत सोयी सुविधा मंजूर करून घेण्यास घेण्यास सानपाडा येथील सामान्य नागरिक यांचा मोलाचा वाटा असल्याचे या वेळी बोलताना दशरथ भगत यांनी सांगितले. या सुविधांबाबत नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## पोलिसांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

अमली पदार्थविरोधी सप्ताह व राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून शनिवारी रबाळे एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या एपीआय किरण पाटील यांनी नवी मुंबई महानगरपालिका संचलित राजश्री छत्रपती शाहू महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाहू महाराजांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक अमोल खरसंबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अमली पदार्थ सेवन करू नये, अशी शपथ क्रीडा शिक्षक अमोलकुमार वाघमारे यांनी दिली. शेवटी आभार विज्ञान शिक्षक संतोष कारंडे यांनी मानले. या कार्यक्रमास पोलीस मित्र किशोर जाधव व मगरसाहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शिक्षक रामराव कदगुळे, दिलीप निंबारा, मेथाजी देसाई, ब्रिजलाल ठाकरे, शिल्पा टिकले, नीतू गावित यांनी केले कार्यक्रमास इ. नववीमधील ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेच्या शाळांमध्ये अवतरली 'पंढरी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्त २८ ते ३० जून या तीन दिवसांमध्ये महापालिकेच्या १० शाळांनी वारकरी, विठ्ठल-रूखमाईची वेशभूषा करून आलेल्या विद्यार्थ्यांसह दिंडीचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाबरोबरच आपल्या परंपरांची माहिती व्हावी या हेतूने दिंडीचे आयोजन सर्व शाळांमध्ये करण्यात आले होते. या वेळी विठ्ठलाची पालखी सोबत काढलेल्या दिंडीमध्ये सर्व मुले टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंगामध्ये दंगून गेली होती. या दिंडींमध्ये मुलांनी पारंपारिक खेळाचे प्रात्यक्षिक केले.

डोक्यावरती तुळस घेऊन लहान वारकऱ्यांनी काढलेल्या





या दिंडीतील विद्यार्थ्यांचे आयुक्त गणेश देशमुख यांनी कौतुक केले. शिक्षण विभागाच्या अधिक्षक किर्ती महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक शाळांच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी शाळांमध्ये विठ्ठलाच्या नामघोषात दिंडी काढली.

## रिटघर विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे शुक्रवारी (दि. ३०) दिंडी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. साळुंखे यांनी यानंतर रिटघर गावात इ. पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांची लेझीमच्या गजरात दिंडी काढण्यात आली. दिंडीमध्ये विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

गावातील विठ्ठल मंदिरात दर्शन घेऊन विद्यार्थ्यांनी भजन सादर केले. त्यानंतर प्रल्हाद भोपी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. शेवटी विद्यालयात दिंडी परतल्यानंतर विद्यार्थी, शिक्षकांनी आरती घेण्यात आली.

## शेडूंग येथील कॉलेजमध्ये घुमला विठूनामाचा गजर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडूंग येथील सेंट विल्फ्रेड ग्रुप ऑफ कॉलेजमध्ये आषाढी एकादशीनिमित्त सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी एकादशी पालखी मिरवणूक काढून रिंगण, अभंग, झपाटा, गजर अशा कार्यक्रमांचे सादरीकरण उत्साहपूर्ण वातावरणात केले.

छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. एल. वर्मा यांच्या हस्ते विठ्ठल रखुमाई, संत ज्ञानेश्वर माऊली प्रतिमा पूजन झाले. यानंतर विठ्ठलाच्या आरतीने तसेच नामघोषाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाचा वेश परिधान केला होता. सेंट विल्फ्रेड ग्रुप ऑफ कॉलेज ते छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ अशी पारंपारिक पध्दतीने दिंडी मिरवणूक काढण्यात आली.



या वेळी सेंट विल्फ्रेड्स इन्स्टिट्यूशन ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. दिनानाथ झाडे, सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉचे प्राचार्य डॉ. मृत्युंजय पांडे, छत्रपती शिवाजी महाराज तंत्रज्ञान संस्थेचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र दुबे, सेंट विल्फ्रेड्स कॉलेजचे प्राचार्य कला वाणिज्य आणि विज्ञान डॉ अनिरुद्ध ऋषी, सेंट विल्फ्रेड्स इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरचे डॉ. साजू चारियन, सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटीचे सांस्कृतिक प्रमुख महेश जाधव, सांस्कृतिक विभाग प्रा. स्वाती मोरे, स्वप्नील भोईर, पल्लवी भोर, डॉ. अक्षय मेश्राम, तपस्या पाटील, विल्फ्रेड्स ग्रुप ऑफ कॉलेजचे सर्व विद्यार्थी व शिक्षकवर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाला सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. केशव बडाया यांनी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख महेश जाधव यांनी सांगितले की, सन २०२३-२०२४मध्ये विद्यार्थ्यांचा मुंबई युनिव्हर्सिटीच्या युथ फेस्टिवलमध्ये जास्तीत जास्त सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा

## ■ रायगड जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेनुसार खरीप २०२३ ते रब्बी २०२५-२६ हंगामातील अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात चोलामंडलम एम.एस.जनरल इन्शुरन्स कंपनीची निवड करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-पीक ॲपव्दारे आपल्या पिकांची नोंदी ७/१२ उताऱ्यावर करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

या योजनेची उद्दिष्टे नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे ही आहेत.



योजनेची वैशिष्ट्ये कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी पाच टक्के असा मर्यादित ठेवला आहे. रायगड जिल्ह्यात ही योजना चोलामंडलम एम.एस. जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत राबविण्यात येणार आहे.

अधिसूचित करावयाची पिके भात व नागली आहेत. जोखमीच्या बाबींमध्ये हवामान घटकातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान, पिकाच्या हंगामामध्ये प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांवर होणारे नुकसान, पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, क्षेत्र जलमय होणे, भू:स्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, कीड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पादनात होणारी घट, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाचे होणारे नुकसान, नैसर्गिक कारणांमुळे पिकाचे होणारे काढणीपश्चात नुकसान या बाबींचा समावेश आहे.

या योजनेंतर्गत शेतकरी हिश्याचा भारसुद्धा शेतकऱ्यांवर न ठेवता शेतकऱ्यांच्या हिश्याचा विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येईल. त्यामुळे सन २०२३-२४पासून शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करता येईल. प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेली शेतकरी हिश्याची पिकनिहाय प्रति हेक्टरी विमा हप्ता रक्कम व शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात भरावयाचा विमा हप्ता रक्कम एक रुपये वजा जाता उर्वरित फरकाची रक्कम राज्य हिस्सा अनुदान म्हणून राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.

विमा हप्ता भरण्यासाठी चोलामंडलम एम.एस.जनरल इन्शुरन्स कंपनीचे तालुका कार्यालय, सर्व राष्ट्रीयकृत व सहकारी बँका, सी.एस.सी सेंटर किंवा पिक विमा पोर्टल येथे सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीकरिता आपल्या तालुक्यातील कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. या योजनेमध्ये सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै अशी आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी कळविले आहे.

(छाया : धम्मशील सावंत)





# बकरी ईदनिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप व रक्तदान

## शिक्षक नुरखाँ पठाण यांची अनोखी कुर्बानी

**पाली : प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षक नुरखाँ पठाण यांनी बकरी ईद विधायक पद्धतीने साजरी करीत कुर्बानीचा नवा अध्याय लिहिला आहे. त्यांनी बकरी ईदनिमित्त एखाद्या प्राण्याची कुर्बानी देण्यापेक्षा त्यांच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. त्याचप्रमाणे रक्तदान केले. या विधायक कार्याला त्यांचे दोन भाऊ इब्राहिम व अल्ताफ यांनीही साथ देत रक्तदान केले.

नुरखाँ पठाण हे मागील १२ वर्षांपासून आर्थिक कुर्बानी देत आहेत. याद्वारे ते असंख्य विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल असे शैक्षणिक साहित्य देत असतात. त्यामुळे गोरगरीब व आदिवासी विद्यार्थ्यांना शिकणे सुलभ व आनंददायी होत आहे. याशिवाय ते मागील दोन वर्षांपासून बकरी ईदला रक्तदान करीत आहेत. या आधीदेखील विविध दिवशी रक्तदान करीत आले आहेत. त्यांची आणखी एक ओळख म्हणजे संविधानाचा अभ्यासक म्हणून असून ते संविधान जनजागृतीचे कार्य सोशल मीडियाच्या माध्यमातून करीत असतात तसेच राज्यात विविध ठिकाणी व्याख्यानेही देतात. आपले संविधान राज्यपद्धतीच नव्हे, तर जीवनपद्धती नावाने त्यांचे पुस्तकदेखील गेल्या वर्षी १४ एप्रिल रोजी प्रसिद्ध झाले आहे. तेव्हापासून त्या पुस्तकाच्या आठ हजार प्रती संपल्या आहेत.

### कुर्बानीचा व्यापक अर्थ

कुर्बानी या संकल्पनेचा तसा बघितला तर व्यापक अर्थ आहे, परंतु कुर्बानी म्हटले की, केवळ प्राण्यांचीच कुर्बानी हाच एक अर्थ घेतला जातो. काळाची गरज म्हणून कुर्बानी या शब्दाच्या व्यापक अर्थाला प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देणे गरजेचे आहे. त्यासाठीच हा आर्थिक कुर्बानी व रक्तदान हा एक छोटासा प्रयत्न आहे, असे नुरखाँ पठाण यांनी सांगितले.

*खरंतर अशा प्रकारच्या पब्लिसिटीची परवानगी धार्मिकदृष्ट्या मला नाही, परंतु या माहिती संप्रेषणाच्या जमान्यात बदलता काळ व गरजेनुसार कुर्बानीचा हा नवा अध्याय इतरांनाही अनुकरणीय ठरावा हा उद्देश आहे. म्हणूनच आज पहिल्यांदा अशा प्रकारची पोस्टदेखील सोशल मीडियावर शेअर केली आहे.*

**-नुरखाँ पठाण, शिक्षक**

# ढोल ताशा पथकाकडून चहा-पाण्याची व्यवस्था

## धाकटी पंढरीत सेवा

**खोपोली : प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या धाकटी पंढरी साजगाव येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने हजारो भाविक, भक्त, वारकरी यांनी विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच माऊलीचे दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी लांबच लाब रांग लागल्याचे पहावयास मिळाले. दरम्यान, दिवसभर पाऊस पडत असल्यामुळे रुद्रा शंभू ढोल ताशा पथक लव्हजी यांच्या माध्यमातून चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली. या वेळी प्रत्येक भाविकास गरम चहा देण्यात आला.



(छाया : जयवंत माडपे)

सकाळपासून पाऊस आणी त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण होत असल्यामुळे शरीरात ऊर्जा निर्माण व्हावी शिवाय या उद्दात विचारातून प्रत्येक वारकरी, भाविक, भक्तास आदाराने चहा, पाणी दिले जात होते. मुखात विठ्ठलाचे नामस्मरण करीत तरुणवर्ग पहाटेपासून चहा वाटपाचे काम करीत होता. प्रत्येकाला चहा मिळावा यासाठी त्यांचे सहकारी या ठिकाणी चहाची विनामूल्य व्यवस्था आहे असे प्रत्येकास आवर्जून सांगत होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आपल्याला वारकऱ्यांची सेवा करण्याचा लाभ मिळाला याचा मनस्वी आनंद होत असल्याचे रुद्रा शंभू ढोल ताशा पथक लव्हजीचे अध्यक्ष रोहित पाटील, उपाध्यक्ष प्रतिक पाटील, गणेश पाटील, सहकारी ऋतिक पाटील, योगेश पाटील, जय, अभिषेक पाटील, कुणाल ठोंबरे, अनिकेत पाटील, चेतन पाटील, साई थरकुडे, अदित्य थरकुडे, निशांत कोंडे, दीपक फराट, सिद्धेश पाटील, गौरव पाटील यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# गोशाळा अनुदानासाठी १९ जुलैपर्यंत अर्ज करा

**अलिबाग : प्रतिनिधी**

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात योजना राबविण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

कर्जत तालुक्यातील लाभार्थ्यांना हा लाभ आधी मिळाला असून आता पनवेल, खालापूर, कर्जत, पेण, रोहा,पाली-सुधागड, माणगाव, महाड, पोलादपूर, तळा, श्रीवर्धन, मुरूड, अलिबाग या प्रत्येक तालुक्यातून एका गोशाळेसाठी अनुदान देण्यात येणार असून इच्छुकांनी आपले अर्ज १९ जुलैपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. रत्नाकर काळे यांनी केले आहे.

इच्छुकांनी नमुन्यातील परिपूर्ण अर्ज आपल्या संबंधित तालुक्याच्या पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांच्याकडे सादर करावेत, असेही त्यांनी कळविले आहे.

# कोकण विकासाचे नवे पर्व : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबतीत अनेक सर्वसामान्य माणसांना सुखद अनुभव येतोय, हे सरकार खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे सरकार वाटू लागले आहे. मंत्रालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला भेटणे, त्यांचे लक्षपूर्वक ऐकणे, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी संबंधित खात्याला तिथल्या तिथे आदेश देणे अशी साधारणत: मुख्यमंत्र्यांची कार्यपद्धती राहिली आहे. सतत कार्यमग्न असणे हा त्यांचा स्वभाव आहे. जनसामान्यात एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांमध्येही एकरूप होणे याची प्रचिती वारंवार त्यांच्या दौऱ्यादरम्यान दिसून येते.

उदाहरणच द्यायचे झाले तर नुकताच रत्नागिरी येथे झालेल्या शासकीय व उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या कौशल्य विकास वास्तूच्या लोकार्पण कार्यक्रमात मुख्यमंत्री विद्यार्थ्यांसोबत रमले. सुरक्षेचे कोणतेही कारण न सांगता विद्यार्थ्यांसमवेत सेल्फी काढली. एवढेच नव्हे तर त्यांच्यात मिसळून मनमोकळ्या गप्पादेखील केल्या. पनवेल-रायगड येथे फाईव्ह जी नेटवर्कच्या राष्ट्रव्यापी शुभारंभ कार्यक्रमात तर मुख्यमंत्र्यांनी खुर्चीऐवजी मुलांसमवेत बेंचवर बसणे पसंत केले. फाईव्ह जी तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमातून विषय समजण्यास अधिक सोपे होऊन, स्मार्ट क्लासमध्ये परिवर्तन होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कौटुंबिक जबाबदारीमुळे मला शिक्षण घेता आले नाही, परंतु नुकतेच मी माझे बीएपर्यंत शिक्षण पूर्ण केले. हे सांगायला मुख्यमंत्री विसरले नाहीत. या पुढील काळातही आणखी बऱ्याच गोष्टी करायच्या आहेत. इतके वर्ष समाजात काम करताना मला जगाच्या विद्यापीठाने खूप काही शिकवले. सर्वांत महत्वाची गोष्ट मी शिकलो. ते म्हणजे विनम्रता, असे उद्गार ठाणे जिल्ह्यातील नेरूळ येथील डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने डी.लिट पदवीने सन्मान करण्यात आला त्यावेळी त्यांनी काढले. श्री. शिंदे आपला वाढदिवस कोणताही बडेजाव न करता ठाण्यातील स्वयंम दिव्यांग पुर्नवसन केंद्राच्या वतीने स्व. गंगुबाई शिंदे बहुउद्देशीय सभागृहात दिव्यांग व विशेष मुलांसोबत केक कापून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करतात. त्यानंतर ते दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजनदेखील करतात. आगळेवेगळे मुख्यमंत्री म्हणून त्यांची प्रतिमा लोकांमध्ये उभी राहते आहे हे विशेष होय.

गुरुपौर्णिमेनिमित्त टेंभीनाक्यावरील आनंदाश्रमात येऊन मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे आणि स्व. आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. या दोघांची शिकवण आचरणात आणून सामान्यांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहिल, अशी ग्वाही त्यांनी दिली. एकूणच काय तर श्री. शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे पानी रे पानी तेरा रंग कैसा जिसमे मिलाओ उस जैसा, असे म्हटले तरी वावगे ठरू नये!

अशा बहुआयामी, हरहुन्नरी श्री. शिंदे यांनी कोकणातील सर्वांगीण विकासासाठी तत्पर असल्याचे गेल्या वर्षभरात कोकण विभागासाठी केलेल्या विविध लोकोपयोगी योजना आणि घोषणा यावरून दिसून येते. कोकणाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ही एक नांदीच ठरेल.

**कोकणातील सर्वांगीण विकासासाठी कार्यतत्पर असणारे मुख्यमंत्री**

नुकताच ठाणे जिल्ह्यात झालेल्या कार्यक्रमात 'हर घर जल'प्रमाणेच हर घर ऊर्जा हे उद्दिष्ट ठेवून राज्यातील गरीबांच्या जीवनात प्रकाश आणण्याचा निर्धार व्यक्त करताना शहापूरसारख्या आदिवासी तालुक्यात ऊर्जा महोत्सव घेऊन ग्रामीण भागातील जनतेचे आयुष्य प्रकाशमय करण्याचे काम श्री. शिंदे यांनी केले. या वेळी ते म्हणाले की, मंत्रिमंडळ बैठकीत वीज वितरण सुधारण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. त्यामुळे वीज गळती आणि वितरणातील हानी कमी होईल. राज्यातील ग्राहकांसाठी प्रीपेड-स्मार्ट मीटर बसविण्यात येतील त्याचा एक कोटी ६६ लाख ग्राहकांना फायदा होईल.

**मुंब्रा जंक्शन**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ हा ठाणे जिल्ह्याच्या शहरी भागातील एक महत्त्वाचा रस्ता आहे. हा महामार्ग मुंब्रा वाय जंक्शन, शिळफाटा-कल्याण फाटा जंक्शन या भागातून जात असल्यामुळे त्या भागाचा विकास होत आहे.

मुंब्रा वाय जंक्शनवरील एमएमआरडीएने बांधलेल्या ३+३ अशा दुहेरी मार्गिकेच्या या उड्डाणपुलामुळे जेएनपीटीकडून येणारी अवजड वाहतूक आणि गुजरातकडे जाणारी वाहतूक विभक्त होते. त्यामुळे जेएनपीटी आणि गुजरातच्या सीमेवरून येणाऱ्या अवजड कंटेनरच्या वाहतुकीसाठी हा उड्डाणपूल उपयुक्त ठरेल तसेच मुंब्रा शहरातून येणाऱ्या स्थानिक वाहतुकीमुळे होणारी गर्दीदेखील टळेल.

**विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पुलाचे बांधकाम**

शिळफाटा, डोंबिवली/ कल्याण या भागांमधील विकसकामांमुळे निवासी संकुलामध्ये नागरी वाढ लक्षात घेता हा प्रकल्प फायदेशीर ठरेल. या प्रकल्पामध्ये रस्ता रुंदीकरणासह उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंतर्भाव आहे. या उड्डाणपुलाची एकूण लांबी पोहचमार्गासह ८२० मी. असून रुंदी २४.२० मीटर (३+३ मार्गिका) इतकी आहे. शीळफाटा रस्त्याला पर्यायाचा विचार, शिळाफाटा ते भिवंडी मल्टिलेव्हल रस्ता असे मोठे प्रकल्प उभे राहत आहेत.

बाळासाहेबांच्या काळातील दादोजी कोंडदेव स्टेडियम कात टाकतेय. या स्टेडियमच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. वाड्यापाड्याचे टुमदार जुने ठाणे विकसित होत आहे. ठाण्यात भविष्याच्या दृष्टीने नवनवीन बदल होत आहेत. यामुळे ठाणेकरांना आधुनिक सेवासुविधा मिळत आहेत. ठाण्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. सँडोज इंडिया या औषध निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या दिघा गावातील प्रकल्पातील नव्या युनिटचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. ही कंपनी सुमारे २५० कोटीची गुंतवणूक करून याद्वारे जेनेरीक औषधांची निर्मिती करणार आहे. यामुळे सुमारे ५०० ते ६०० रोजगार निर्मिती होणार आहे.

**अमृत महाआवास अभियान**

नव्याने सुरू होत असलेल्या अमृत महाआवास अभियान कालावधीत सन २०२१-२२करिता प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणसाठी ठाणे जिल्ह्याला दोन हजार ८१८ घरकुलांचे उद्दिष्ट मिळाले आहे. यापैकी दोन हजार ३३० लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आलेली असून उर्वरित ४८८ मंजुरीची कार्यवाही सुरु आहे तसेच आदिम, रमाई व शबरी या राज्य पुरस्कृत योजनांकरिता ८९७ चे उद्दिष्ट प्राप्त असून, त्यापैकी ६४२ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आलेली आहे. अजून २५५ मंजुरीची कार्यवाही सुरू आहे. हे सर्व मंजुर घरकुले १०० दिवसांत पूर्ण करून राज्यामध्ये अव्वल कामगिरी बजावत अमृत महाआवास अभियानातंर्गत प्रथम क्रमांक पटकावण्याकरिता प्रयत्नशील आहे.

**नवीन रेल्वेस्थानकाचा लाभ ठाणेकरांना**

ठाणे ते मुलुंडदरम्यानच्या नवीन रेल्वेस्थानकासाठी मनोरुग्णालयाची जमीन मिळण्यातील स्थगिती उच्च न्यायालयाने उठवली आहे. त्यामुळे नवीन स्थानकाचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्थानकामुळे मूळ ठाणे स्थानकावरील ताण कमी होईल आणि लाखो ठाणेकरांना त्याचा लाभ मिळेल.



अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिर परिसर विकसित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर १३८ कोटी रुपये शिवमंदिर परिसराच्या विकासासाठी दिले. त्याशिवाय या शहराचे आरोग्य चांगले राहावे यासाठी घनकचरा प्रकल्पासाठी १५० कोटी, रस्त्यांच्या कामासाठी २२२ कोटी, जिल्हा वार्षिक योजनेतून १०७ कोटी, दलित वस्तीमधून ३२ कोटी, वैशिष्ट्यपूर्णमधून ७८ कोटी, इतर कामासाठी ४८ कोटी निधी दिला आहे.

**दिवा शहरातील अनधिकृत इमारती हद्दपार**

सुनियोजित शहर म्हणून दिवा शहर विकसित करण्यासाठी ठाण्याप्रमाणेच दिवा शहरातही समूह विकास योजना (क्लस्टर) राबविण्यात येणार आहे. दिवामध्ये स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या इमारतीसाठी पाच कोटी देण्याची घोषणाही मुख्यमंत्री यांनी केली.

आतापर्यंत या शहरात पाणीपुरवठ्यासाठी २४० कोटी, दिव्यातील रस्त्यांसाठी १३२ कोटी, दिवा-आगासन रस्त्यासाठी ६३ कोटी, आगरी कोळी वारकरी भवनसाठी १५ कोटी, देसाई खाडीपूलसाठी ६७ कोटी, आगासन येथे १०० खाटांच्या रुग्णालयासाठी ५८ कोटी, खिडकाळी, दातिवली, देसाई तलावच्या सुशोभिकरणासाठी २२ कोटी व खिडकाळेश्वर मंदिराच्या विकासासाठी १३.५ कोटी असे एकूण ६१० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यापुढील काळातही आणखी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात येणार आहे.

कल्याणमध्ये दीड लाख लाभार्थींना लाभ दिला. प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार, तालुक्यात १५ हजार आणि गावात किमान १०० लाभार्थींना योजनांचा लाभ मिळालाच पाहिजे या दृष्टीने सर्व तयारी केली. या अभियानासाठी १६ हजार योजना दूत नेमले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयात जनकल्याण कक्ष सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा जनकल्याण कक्ष सुरू केले आहेत त्यातून नियोजन होते आहे.

**रायगड जिल्हा अधिक विकासाठी सज्ज**

महाडमधील चवदार तळ्याच्या सुशोभिरणासाठी निधी देण्यात येणार आहे. सुवर्ण मंदिराच्या धर्तीवर चवदार तळ्यासाठीदेखील पाणी शुद्धीकरण यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. चवदार तळे हा ऐतिहासिक ठेवा आहे.

प्रगती, समृद्धी आणि विकासाची गंगा घराघरामध्ये पोहचविण्याचे सर्व तऱ्हेचे प्रयत्न सुरू आहेत. आंबा प्रक्रिया उद्योग, काजू विकास महामंडळ, कांदा प्रक्रिया असे विविध शेतीपूरक उपक्रम राबविले जात आहेत. यासाठी दोनशे कोटी रुपये देण्याचे शासनाने ठरविले आहे. प्रतापगडाच्या संवर्धनासाठी खासदार उदयनराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासन प्राधिकरण निर्माण केले जाणार आहे. मुंबईतील कोस्टल रोडला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव देण्यात येणार आहे.

**रत्नागिरी जिल्हा परिपूर्ण विकासाच्या वाटेवर**

कोकणातील सर्व जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासाठी कोकण महानगर विकास व नियोजन प्राधिकरण स्थापन करणार आहे, अशी घोषणा रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासकामांचा आढावाप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली.

शासकीय तंत्रनिकेतनच्या परिसरात झालेल्या शासन आपल्या दारी या महत्त्वाकांशी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाला जिल्हा विकास निधीतून उपलब्ध करीन देण्यात आलेल्या १० बोलेरो वाहने, २० मोटरसायकली व चार बसेसचे लोकार्पण करण्यात आले.

गेल्या अकरा महिन्यांत ३५ कॅबिनेट बैठका आणि त्यातून ३५० निर्णय हे सर्वसामान्य माणसांच्या हिताचे घेण्यात आले आहेत. सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात सुखी-समाधानाचे दिवस यावेत, शासनाविषयी जनतेच्या मनात सकारात्मक भावना निर्माण व्हाव्यात हा या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे. रत्नागिरी जिल्ह्याकरिता ५० नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रत्नागिरी जिल्हा शैक्षणिक हब निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

निसर्ग चक्रीवादळानंतर राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत रत्नागिरी शहर व परिसरातील सर्व विद्युत वाहिन्या भूमिगत पद्धतीने असाव्यात असे नियोजन करण्यात आले. या कामी ९७ कोटी खर्च अपेक्षित असून या प्रकल्पाचे ७३ टक्के काम पूर्ण झाले आहे.

**सागरी, डोंगरी, नागरी पालघर जिल्हा**

मत्स्य व्यवसाय धोरणाबाबत प्रयत्न केले जातील. मत्स्य व्यवसायातून परकीय चलन कसे उपलब्ध होईल यासाठी योजना केली जात आहे. तामिळनाडू आणि गुजरातच्या मत्स्य व्यवसाय पॉलिसीबाबत अभ्यास करून त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

कोकण विकासाचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले जातील. राज्यातील गड-किल्ल्यांच्या बरोबरच कोकण विभागातील गड-किल्ल्यांच्याबाबत निर्णय घेतले जातील. केरळप्रमाणे बॅक वॉटरमध्ये पर्यटनवाढीसाठी बांधा आणि वापरा तत्वावर विविध सेवा सुविधा पुरवल्या जातील. कोकणातील साकव, विम्यातील त्रुटी, बीच डेव्हलपमेंटसाठी प्रयत्न, सिंचनाच्या सुविधा याबाबत प्रयत्न केले जातील. औरंगाबाद पुणे मार्गाच्या धर्तीवर मुंबई ते सिंधुदुर्ग हा एक्सेस कंट्रोल मार्ग करता येईल का? याबाबतही अभ्यास करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेतील पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'गगनभरारी' ही योजना सुरू करण्यात आली असून, यातून निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना 'नासा' प्रशिक्षणासाठी पाठवण्याची योजना आहे. गोळप येथे एक मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मितीचा प्रकल्पही उभारण्याची योजना सुरू आहे.

शासन आपल्या दारी या कार्यक्रमात रोजगार मेळावा घेण्यात आला आहे. दोन ते तीन हजार तरुणांना रोजगारही उपलब्ध होणार आहे. राज्यात ३५ लाख लाभार्थ्यांपर्यंत विविध योजना या अभियानाच्या माध्यमातून पोहचविल्या आहेत. सामान्य माणसापर्यंत जोपर्यंत योजना पोहचणार नाही तोपर्यंत सरकार काम करीत राहिल. सर्वसामान्यांसाठी हे सरकार वर्षाभरापूर्वी स्थापन झाले. या सरकारने सामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. कोणालाही वैयक्तिक लाभ होईल, असा निर्णय घेतलेला नाही. शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, तरुणवर्ग यांना केंद्रबिंदू मानून शासन काम करीत आहे. पालघर जिल्ह्यामध्ये दोन लाख १२ हजार ६८३ लाभार्थ्यांना २१२ कोटी रुपयांचा लाभ शासन आपल्या दारी या अभियानातंर्गत देण्यात आला.

वर्षभरात कोकण विभागात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले दौरे आणि कामाची गती पाहता असे लक्षात येईल की, मुख्यमंत्री सर्वसामान्य माणसाचा विकास हा केंद्रबिंदू ठेवून कोकण विकासाचे नवे पर्व उभे करीत आहे. यातून कोकणी माणूस सुखी व समाधानी दिसत आहे.

**-संजीवनी जाधव-पाटील,**
सहाय्यक संचालक (माहिती),
कोकण विभाग, नवी मुंबई

# भारतीय कबड्डी संघ आशियाई चॅम्पियन

## इराणवर मात करून सुवर्णपदकावर कोरले नाव

**बुसान : वृत्तसंस्था**

कोरिया प्रजासत्ताकमधील बुसान येथील डोंग-युई इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी सेओकडांग कल्चरल सेंटर येथे शुक्रवारी झालेल्या आशियाई कबड्डी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत भारतीय कबड्डी संघाने इराणचा ४२-३२ असा धुव्वा उडवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. भारताचे हे नऊ आवृत्त्यांमध्ये आठवे विजेतेपद ठरले आहे.



भारतीय कर्णधार पवन सेहरावतने सुपर १० बरोबर आघाडी केली. सामन्याच्या सुरुवातीच्या पाच मिनिटांत भारतीय पुरुष कबड्डी संघ इराणविरुद्ध गारद झाला, मात्र खेळाच्या १०व्या मिनिटाला बचावाच्या काही टॅकल पॉइंट्स आणि पवन सेहरावत आणि अस्लम इनामदार यांच्या यशस्वी चढाईनंतर इराणला ऑलआऊट करण्यात टीम इंडियाला यश आले. इराणच्या मोहम्मदने भारताच्या अर्जुन देश्वालच्या काही चढाया अपयशी ठरल्यानंतर त्यांच्या संघासाठी खाते उघडले. अखेर भारतीय संघाचा खेळाडू अर्जुनने पहिला गुण मिळवून दिला. ३-३ अशी गुणसंख्या असताना सामना अटीतटीचाच वाटत होता, पण सामन्यात नितेशची मजबूत पकड अन् पवन शेहरावतच्या जबरदस्त चढायांच्या जोरावर भारताने १०-४ अशी आघाडी घेतली. त्यानंतर टीम इंडियाने मागे वळून पाहिले नाही. नितीन रावतनेही चांगल्या कामगिरी केली. पहिल्या हाफमध्ये भारताने २३-११ अशी आघाडी मजबूत केली होती.

या हाय-व्होल्टेज फायनलमध्ये नंतर कर्णधार मोहम्मदरेझा शादलुई छायानेहच्या सुरेख खेळामुळे इराणने उत्तरार्धात उत्तेजित पुनरागमन केले आणि हे अंतर बरेच कमी केले. दुसऱ्या सत्रात इराणकडून चांगला खेळ पाहायला मिळाला. ३३-१४ अशा पिछाडीवर असलेल्या इराणने सामना ३८-३० असा चुरशीचा बनवला. त्या सत्रात भारताला केवळ पाच गुण मिळवता आले, पण दुसऱ्या बाजूला इराणने १६ गुणांची कमाई केली करीत सामन्यात रोमांचकता आणली. शेवटच्या टप्प्यात भारताच्या खेळाडूंनी दमदार खेळ करीत ४२-३२ असा रोमहर्षक विजय निश्चित केला.

# रत्नागिरी जेट्स ठरले एमपीएलचे विजेते!

## पावसामुळे कोल्हापूर टस्कर्सच्या पदरी निराशा

**पुणे : प्रतिनिधी**

एमपीएलमध्ये रत्नागिरी जेट्सने पहिलीवहिली ट्रॉफी आपल्या नावावर केली. सलग दुसऱ्या दिवशीही पावसाने घोळ घातल्याने कोल्हापूर टस्कर्सच्या पदरी निराशा पडली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेचा अंतिम सामना शुक्रवारी (दि. ३०) पार पडला. रत्नागिरी जेट्स आणि कोल्हापूर टस्कर्स यांच्यातील हा सामना वेळापत्रकानुसार गुरुवारी होणे अपेक्षित होते, मात्र पावसामुळे नाणेफेकही न झाल्याने सामना राखीव दिवशी शुक्रवारी खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना कोल्हापूर फलंदाजी करीत असताना वरुणराजाने व्यत्यय आणला. त्यामुळे हा सामना पूर्ण होऊ न शकल्याने रद्द करण्यात आला आणि गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर राहिलेल्या रत्नागिरी जेट्स संघाला विजयी घोषित करण्यात आले.



# माथेरानच्या सृष्टी दरेकरला बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

नागपूर कामठी येथे नुकत्याच झालेल्या महिला बॉक्सिंग स्पर्धेच्या हेविवेट कॅटेगरीमध्ये माथेरानच्या सृष्टी निलेश दरेकर हिने रौप्यपदक पटकाविले आहे. अंतिम सामन्यात ती मुंबईच्या जागृती बोथकडून पराभूत झाली असली तरी सृष्टीच्या आक्रमक खेळाने प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

सृष्टी साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे योगेश मुंदडा हे तिचे प्रशिक्षक आहेत. सृष्टी पाचगणीच्या पायथ्याशी असलेल्या करहर गावी फिटनेस मंत्रा या जिममध्ये प्रशिक्षण देत असते. या कामगिरीबद्दल तिचे क्रीडा शिक्षक सुनील शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते भास्कर शिंदे, पतसंस्थेचे माजी सभापती हेमंत पवार, सचिव योगेश जाधव यांनी कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# थाय किक बॉक्सिंग स्पर्धेत पेणच्या खेळाडूंचे यश



**पेण : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील बांठिया स्कूलमध्ये पहिली रायगड जिल्हा थाय किक बॉक्सिंग स्पर्धा रायगड थायकिक बॉक्सिंग असोसिएशन आणि पनवेल सिटी थायकिक बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पेणच्या खेळाडूंनी यश प्राप्त केले आहे.

स्पर्धेत पेणच्या युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशनमध्ये शिहान रवींद्र म्हात्रे यांच्याकडे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी रितेष उत्तम पवारने सुवर्णपदक, कनक श्रीकांत कचरे, नील धनंजय पाटील, मोहित परशुराम कोठेकर, रितुल रवींद्र म्हात्रे यांनी रौप्य आणि रूद्रेश प्रथमेश पाटील व गौरव गोरखनाथ म्हात्रे या खेळाडूंनी कांस्यपदक पटकाविले. यासह त्यांनी तृतीय क्रमांकाची रायगड जिल्हा चॅम्पियनशिप जिंकली.






# खालापूरचा दिनेश पवार एशियन गोल्ड मेडल विजेता



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हॉगकाँग येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील पॉवरलिफ्टिंग आणि बेंच प्रेस स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत विविध देशांच्या जवानांनी सहभाग घेतला होता. यात ७४ किलो वजनी गटात खालापूर तालुक्यातील महड येथील दिनेश पवार याने भारताचे प्रतिनिधित्व करून एशियन गोल्ड मेडल पटकावले.

दिनेश पवारने देशाचे नाव उज्ज्वल करून क्रीडा क्षेत्रात खालापूर तालुक्याचा नावलौकिक उंचावला आहे. या यशाबद्दल त्याच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com